नियमित दिवाणी मुकदमा क्र. १०९/२०१८

(श्रीमती रत्नप्रभा रेवाडकर – वादी वि. श्री. प्रकाश दाभोलकर वगैरे –प्रतिवादी)

## :– नि. ५८ खालील आदेश –:

१. अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. वादी यांनी सदरचा अर्ज या दाव्यातील प्रतिवादी नं. १अ या दिनांक २६/०५/२०२२ रोजी मयत झाल्या असून त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होवून त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळावी यासाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचे अर्जातील कथन की, वादी यांचेकडून प्रतिवादी नं. १अ याचा मयत दाखल उशीरा मिळाल्याने त्यांचे वारस दाखल करणे राहून गेले आहे. वादी यांना दाव्यामध्ये पूर्ण स्वारस्य आहे. त्यामुळे वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांना प्रतिवादी नं.१अ चे वारस दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून त्यांचे वारस अभिलेखावर घेण्याबाबतचा प्रस्तुचा अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली आहे.

३. प्रतिवादी यांनी अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन वादी यांनी उशीराने अर्ज दाखल केलेला असून सदरील वारस मुदतीत दाखल केलेले नाहीत तरी खर्चासहीत अर्ज मंजुर करणेत यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

४. मुदतीचा कायदा आर्टीकल १२० नुसार दाव्यातील एखादा पक्षकार मयत झाल्यास मृत्युच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत मयत पक्षकाराच्या कायदेशीर प्रतिनिधींना दाव्यामध्ये समाविष्ट करुन घेणे आवश्यक असते . त्याचबरोबर अशा मयत पक्षकाराबाबत दावा उपशमित झाल्यास आर्टीकल १२१ नुसार ६० दिवसांच्या आत तो आदेश रद्द करुन घेणे आवश्यक आहे.

५. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी नं.१अ लक्ष्मी प्रकाश दाभोलकर या दिनांक २६/०५/२०२२ रोजी मयत झाल्या आहेत. त्यामुळे मृत्यू तारखेपासून पुढे ९० दिवसांचे आत त्यांचे वारसाबाबत दाव्यामध्ये तजवीज करणे आवश्यक होते. परंतु वारस दाखल करण्यास त्यांना विलंब झालेला आहे. प्रस्तुतचा दावा,

हक्कप्रस्थापना व दावा मिळकतीचे धडेवाटप होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे. त्यामुळे परिणामकारक हुकूमनामा काढण्यासाठी प्रतिवादी नं. १अ चे वारस दाव्यामध्ये सामील करणे आवश्यक आहे. सबब सदरचा विलंब माफ करणेकरीता ५८ कडील अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. परंतु वादीने सदरचा अर्ज अतिशय विलंबाने दिलेला असल्यामुळे त्याच्यावर योग्य तो खर्च लावणे आवश्यक आहे . करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. नि. ५८ कडील अर्ज वादी यांनी प्रतिवादी यांना रक्कम रुपये १००/– (रुपये शंभर मात्र ) इतका खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी खर्चाची रक्कम दिल्यानंतर मयत प्रतिवादी नं.१अ यांचे कायदेशीर प्रतिनिधी दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

३. येणेप्रमाणे अर्ज निकाली करण्यात येत आहे.

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2023.02.14 11:05:55 +0530

दिनांक– १३/०२/२०२३

(अ. जो. बाचुळकर)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कुडाळ.